नि.फौ.प्र. क्र. –३०३०१४७/२००२
शासन वि.  सुनिल व इतर
<u>**नि.क्र. ३७७१**</u>

<u>**अभियोग पक्षातर्फे  साक्षीदार क्रमांक ०४ चा शपथेवर सरतपास (आरोपी क्र.३ साठी)**</u>

माझे नाव – **मधुकर भययाजी वखरे,**
वय  –७१  वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त.
राहणार – महाल, नागपूर.

<u>**सरतपास  – अभियोगपक्षा तर्फे विशेष सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.सी.चावरिया यांच्या मार्फत –**</u>

१.  दि.१०.१०.१९७३ पासून ते दि.३१.०८.२०१२ पर्यंत मी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकरीस होतो. दि.१०.१०.१९७३ रोजी मी लिपीक या पदावर रूजू झालो होतो. सन १९९४ पासून मी सदर बँकेच्या मुख्यालयात लेखा विभागात वर्ग–ब अधिकारी म्हणून काम पाहत होतो. सन १९९९ मध्ये सुनिल केदार हे सदर बँकेचे अध्यक्ष, आशाताई महाजण या बँकेच्या उप–अध्यक्षा, सरव्यवस्थापक अशोक चौधरी, व्यवस्थापक एस.एस.गोडे व मुख्य हिशोबनिस सुरेश पेशकर हे होते. या सर्वांच्या सहया, लिखाण व हस्ताक्षर मी ओळखतो. सदर बँकेचे जमा–खर्च घेण्याचे काम माझे होते. माझ्या गैरहजेरीमध्ये सदरचे काम सौ दाणी मॅडम पाहत असत. सदर बँकेचे मुख्य व्यवहार अध्यक्ष सुनिल केदार व सरव्यवस्थापक अशोक चौधरी पाहत होते.

२.  सन १९९९ मध्ये सरकारी प्रतिभूती खरेदीविक्री करणेबाबत बँकेने ठराव केल्याचे मला आठवते. त्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई येथे नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नावे 'एस जी एल' स्वरूपाचे खाते उघडण्यात आले. सरकारी प्रतिभूती या आमच्या बँकेस रिझर्व बँकेकडून खरेदी करता येत नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई यांच्यामार्फत सरकारी प्रतिभुती खरेदी विक्री करण्यासाठी सदरचे 'एस जी

एल' खाते उघडण्यात आले होते. सन २००१ मध्ये सरव्यवस्थापक अशोक चौधरी यांनी मला असे सांगीतले की, सदर एसजीएल खात्यामधून सरकारी प्रतिभूती खरेदी-विक्री करण्याऐवजी होम ट्रेड लिमीटेड मार्फत सरकारी प्रतिभुती खरेदी विक्री केल्यास बॅंकेचा फायदा होईल. त्यांनी मला असे आदेश दिले की, त्याप्रमाणे नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक ही सरकारी प्रतिभुती खरेदीविक्री करणार असून त्यासाठी मी तशी नोंदवही वेगळी ठेवावी. होम ट्रेड लिमीटेडचे खाते महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक, मुंबई येथे होते.

३. सरकारी प्रतिभुती खरेदी विक्री केल्याबाबत चा फॅक्स होम ट्रेड लिमीटेड मार्फत प्रथम सरव्यवस्थापक अशोक चौधरी यांच्याकडे येत असे. सदर फॅक्सवर टिपणी घेवून मंजूरी घेण्यासाठी नोटशिट लिहीण्यासाठी सरव्यवस्थापक अशोक चौधरी मला सांगत असे. दि.०३.०२.२००१ रोजी मी पहिली नोटशिट लिहीली होती. आता साक्षीदारास निशानी ११९७ वरील नोटशिट दाखविण्यात आली. सदरची नोटशिट माझ्या हस्ताक्षरात आहे. त्यावर माझी सही आहे. सदर नोटशिटवर अध्यक्ष सुनिल केदार यांची मंजूरी म्हणून सही आहे. त्याअगोदर मुख्य हिशोबनिस पेशकर यांची सही आहे तसेच सरव्यवस्थापक अशोक चौधरी यांची देखील सही आहे. त्यास **निशानी क्र.११९७/अ-३** असा देण्यात येतो.

४. अध्यक्ष सुनिल केदार व सरव्यवस्थापक अशोक चौधरी हे दोघेच होम ट्रेड लिमीटेड या कंपनीसोबत सरकारी प्रतिभुती खरेदी विक्री बाबत चर्चा करत होते. सदर सरकारी प्रतिभुती खरेदीविक्रीचे व्यवहार दि.०५.०२.२००१ पासून ते पुढे एक वर्ष चालू होते.

निशानी ३७७३ वरील अर्जान्वये सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

(एम.व्ही.फडे)

दिनांक - ०८.०१.२०२६

२रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

नागपूर